महाराष्ट्र शासन
(तंत्रशिक्षण संचालनालय म. रा. मुंबई अंतर्गत, म.रा.तं.शि. मंडळ मुंबई संलग्नित)

# शासकीय तंत्रनिकेतन वाशिम

रिसोड रोड, लाखाळा, वाशिम – ४४४ ५०५
फोन नं (कार्यालय) ०७२५२ – २३२२५२, २३२०८५ Fax No. ०७२५२ – २३२२५२
Email - office.gpwashim@dtemaharashtra.gov.in Web site: - www.gpwashim.edu.in

क्रमांक:- शातंनिवा/जिमखाना /२०२५-२६/ 23

दिनांक:- ०३/०९/२०२५

## जिमखाना परिपत्रक :

**विषय : " मराठी भाषा दूत " या ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धेसाठी सहभाग नोंदविण्याबाबत**

**संदर्भ : मरातंशिमं/विकाना/आस्था/२०२५/१०२८ दिनांक : २६/०८/२०२५**

महाराष्ट्र राज्य शासनाने **३ ऑक्टोबर हा दिवस " अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस "** म्हणून साजरा करण्याचे घोषित केले आहे. तसेच, संपूर्ण राज्यात दिनांक **३ ऑक्टोबर ते ९ ऑक्टोबर हा सप्ताह " अभिजात मराठी भाषा सप्ताह "** म्हणून साजरा करण्यात येणार आहे.

त्या अनुषंगाने, मराठी भाषा विभागातर्फे, **" मराठी भाषा दूत " या ऑनलाईन वक्तृत्व** स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर वक्तृत्व स्पर्धेकरिता **" अभिजात मराठी – माझ्या अपेक्षा "** या विषयाची निवड करण्यात आली आहे. सदर स्पर्धेसाठी प्रथम नोंदणी करणाऱ्या १००० स्पर्धकांना प्रवेश मिळेल. तसेच, या स्पर्धकांमधून १०० उत्तम स्पर्धकांची निवड **मराठी भाषा दूत** म्हणून करण्यात येईल व त्यांचा सन्मान करून गौरविण्यात येईल. सदर वक्तृत्व स्पर्धा दिनांक **१५ सप्टेंबर २०२५ ते २२ सप्टेंबर २०२५ या कालावधीत ऑनलाईन** पद्धतीने घेण्यात येईल.

**वक्तृत्व स्पर्धा नियमावली:**

१. **ही स्पर्धा जगभरातील मराठी भाषकांसाठी खुली असेल.**
२. **१५ सप्टेंबर २०२५ ते २२सप्टेंबर २०२५ या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने ही स्पर्धा घेण्यात येईल .**
३. **वयोमर्यादा १६ ते २१ वर्षे**
**१ जून २००४ ते १ जून २००९ या दरम्यान जन्मतारीख असलेल्या स्पर्धकांना स्पर्धेत सहभागी होता येईल. (या दोन्ही तारखा धरून)**
४. **विषय : 'अभिजात मराठी, माझ्या अपेक्षा' भाषा: मराठी. वेळ :- जातीत जास्त ३ मिनिटे**
५. **सदर स्पर्धेसाठी नोंदणी करण्यासाठी : (अंतिम दिनांक : १२ सप्टेंबर २०२५ वेळ : ०६:०० पर्यंत)**

**Link : https://mtqr.me/OoMZn5v4**

**किंवा समोरील QR Code Scan करा.'**

संदर्भीय पत्रानुसार संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात येते कि, त्यांनी जास्तीत जास्त संख्येने सदर **" मराठी भाषा दूत " या ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धेसाठी सहभाग** नोंदवावा.

**(डॉ. बी. जी. गवलवाड )**
**प्राचार्य**
**शासकीय तंत्रनिकेतन, वाशिम**

**प्रत:** मा. विभागप्रमुख यांच्या मार्फत संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी.
श्री. ओ. पी. घोरसडे यांना संस्थेच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.
जिमखाना सूचनाफलक.